# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

दिनांक: २४/०९/२०२४.

## निविदा सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन तालुका न्यायालयांतील लेझर प्रिंटर टोनर काट्रेजचे रिफिलिंग करणेकामी एक वर्ष कालावधीकरिता सेवासंविधा करारासाठी नवीन पुरवठादार नेमणेकरिता नोदंणीकृत/परवानाधारक शासकीय आस्थापनांना सेवा पुरविणा-या पुरवठादाराकडून निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक सेवा पुरवठादारांनी निविदा सुचने मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लखोटयात निविदा/दरपत्रके सादर करावयात.

पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे
कोर्टनाका, ठाणे प. ४२१३०१

सदरबाबत अधिक माहिती घेणेसाठी सहायक अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडे कामाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळ ०५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा / दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांना राहील.

DISTRICT COURT

हुकूमावरुन,

ठाणे.
दिनांक : २४/०९/२०२४.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे.

# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

प्रभाकर हेगडे मार्ग, कोर्ट नाका, ठाणे प. 400601
फोन नं 022– 25474574 / 25479728
ई–मेल – mahthadc@mhstate.nic.in


जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन तालुका न्यायालयांतील लेझर प्रिंटर टोनर कार्ट्रेजचे रिफिलिंग करणेकामी एक वर्ष कालावधीकरिता सेवासंविधा करारासाठी नवीन पुरवठादार नेमणेकरिता नोदंणीकृत / परवानाधारक शासकीय आस्थापनांना सेवा पुरविणा–या पुरवठादाराकडून निविदा / दरपत्रक मागविण्यात येत आहे.

## विभाग 01

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांतील लेझर प्रिंटर व टोनर कार्ट्रेजच्या प्रकारांचे विवरणपत्र खालीलप्रमाणे :

| अ. क | प्रिंटर मॉडेल | टोनर प्रकार |
|---|---|---|
| 1 | एचपी (1108, 1008, 1022, 1606 डी.एन.एम, लेझरजेट 202 डीडब्ल्यू), कॅनॉन 151 डीडब्ल्यू / 161 डीएन / एमएफ 244 डीडब्ल्यू, सॅमसंग 3310 एनडी | एचपी 78 अे / 88 अे / 12 अे / कॅनॉन 337 / 051 स्टार्टर / सॅमसंग एमएलटी–डी 205 एस / डी 205 डी |
| 2 | क्योसेरा इकोसीस एम 2040 डीएन | इकोसीस एम 2040 डीएन |

टीप :– प्रति टोनर दर दरपत्रकात (प्रपत्र – 01) नमूद करावे.

# विभाग 02 :– अटी व शर्ती

1) निविदाधारकांना निविदा अर्ज, निविदेतील अटी व शर्ती, कामाचे स्वरुप यांची संक्षिप्त माहिती https://thane.dcourts.gov.in संकेतस्थळावरुन डाउनलोड करता येतील.

2) ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळालेपासून 10 दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक असेल.

3) कंत्राटदारांनी पुरविलेल्या टोनरमुळे शासकीय मालमत्ता असलेल्या प्रिंटर मध्ये अतिरिक्त दुरुस्तीचा खर्च उद्भवल्यास त्यांना प्रिंटर दुरुस्त करून देणे बंधनकारक राहील.

4) निविदाधारकांस टोनर रिफिलिंग करणे या कामाचा कमीत कमी एक वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातील अनुभव प्रमाणपत्र अथवा तत्सम कागदपत्रे निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच निविदाधारकाची भागीदारी संस्था असल्यास, भागीदारांचे नावे तसेच त्यांना सदर निविदेकरिता जबाबदार असलेले अधिकारी नमुद करणे आवश्यक आहे.

5) लिफाफा क्रमांक 1 :– निविदाधारकांनी निविदेतील लिफाफ्यामध्ये आवश्यक ते सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

1. कंपनी, संस्थेचे नोंदणीची छायांकित प्रत, Memorandum of Association (MoA), Article of Association (AoA) ची छायांकित प्रत.
2. मागील 3 वर्षाचे आयकर विवरणपत्रे.
3. कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत.
4. जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र.
5. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.
6. भागीदार संस्था असल्यास, भागीदारी कराराची प्रत व नोंदणी केल्याची प्रत.
7. निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र.
8. अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्रे.
9. कंपनी/संस्थेचे बचत अथवा चालू बॅंक खातेचे कागदपत्रे.
10. प्रतींच्या संख्येबाबत हमीपत्र देणे.
11. निविदाकाराने स्वतःवर कोणताही गुन्हा व न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र देणे.

6) ज्या कंत्राटदारांची निविदा स्वीकृत करण्यात येईल. त्यांना सेवा करार करताना उपरोक्त कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करावे लागतील.

7) सदर कामाचे कोणत्याही स्तरावर एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत.

**8) कामाचे स्वरुप** :– जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन सर्व तालुका न्यायालयीन आस्थापनांवरील (कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, बेलापूर, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे) एचपी 78 अे/88 अे/12 अे/ कॅनॉन 337/051 स्टार्टर/ सॅमसंग एमएलटी–डी 205 एस/डी205 डी व क्योसेरा इकोसीस एम 2040 डीएन टोनर काट्रेज रिफिलिंग साठी तालुका न्यायालयात स्वखर्चाने जाणे बंधनकारक राहील.

9) टोनर काट्रेजमधील सर्व भाग/पार्ट्स उदा. शाई, ड्रम, ब्लेड, चीप किंवा इतर सर्वांगिण रिफिलिंग साठी आवश्यक असलेले भाग/पार्ट्स हे त्यांच्या अधिकृत कंपनीचे असावेत.

10) टोनर काट्रेज रिफिलिंग कामात , ड्रम केस व इतर आवश्यक असणा–या सर्व पार्ट्सचा समावेश असेल.

11) निविदाकाराने निविदा भरतांना टोनर रिफिलिंग साठी सर्वसमावेशक म्हणजेच पार्ट्ससहित दर स्पष्टपणे नमूद करावा.

12) रिफिलिंग केलेल्या टोनर काट्रेजचा दर्जा व प्रतींची संख्या याबाबत पुरविण्यात येणारी सेवा अयोग्य/असमाधानकारक वाटल्यास सदरचा करार रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने राखून ठेवले आहेत

13) कंत्राटदाराने रिफिलिंग केलेल्या टोनर काट्रेजमधून येणा–या प्रतींची संख्या कमीत कमी 600 असावी. प्रतींची संख्या व दर्जा याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

14) कंत्राटदारास जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, बेलापूर, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे येथील न्यायालयांनी मागणी केलेनंतर एक दिवसाचे आत टोनर काट्रेज रिफिलिंग करुन देणे बंधनकारक राहील. तसेच कंत्राटदारास प्रत्येक न्यायालयांत अतिरिक्त **(स्टॅन्डबाय)** रिफिलिंग टोनर काट्रेज आवश्यकतेनुसार व मागणीनुसार पुरविणे बंधनकारक राहील.

15) कंत्राटदारास सदर कंत्राट कोणत्याही परिस्थीतीत इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीस पोटभाडयाने देता येणार नाही.

16) कंत्राटदाराने टोनर रिफिलिंगचे दरमहा देयक सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रशासकीय पूर्तता पूर्ण होवून कोषागार कार्यालय, ठाणे यांचेकडून मंजूर झालेनंतर सदरचे देयकाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

17) कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही न्यायालयीन कामाच्या बाबी येतील त्या न्यायालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्याबाबत आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करुन कंत्राट रद्द करणेत येईल.

18) या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना हे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे विहीत केलेल्या गुणवत्तेनुसार ते काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

19) पुरवठादाराकडून पुरविण्यात आलेल्या टोनर काट्रेजमुळे प्रिंटरचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

20) कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांकडून शासकीय मालमत्तेच नुकसान झाल्याचे आढळल्यास, सदरची नुकसान भरपाई ही कंत्राटदारास देय असलेल्या रकमेतून वसूल करण्यात येईल.

DISTRICT COURT THANE

हुकूमावरुन,

प्रबंधक,

ठाणे.
दिनांक : २४/०९/२०२४.

जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे.

# परिशिष्ट

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन तालुका निहाय यादी

| अ.क | न्यायालयाचे नाव |
|---|---|
| 1 | जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे |
| 2 | दिवाणी न्यायालय क स्तर, बेलापूर |
| 3 | जिल्हा व अपर सत्र न्यायालय, कल्याण |
| 4 | दिवाणी न्यायालय क स्तर, भिवंडी |
| 5 | दिवाणी न्यायालय क स्तर, मुरबाड |
| 6 | दिवाणी न्यायालय क स्तर, उल्हासनगर |
| 7 | दिवाणी न्यायालय क स्तर, शहापुर |
| 8 | जिल्हा व अपर सत्र न्यायालय, पालघर |
| 9 | जिल्हा व अपर सत्र न्यायालय, वसई |
| 10 | दिवाणी न्यायालय क स्तर, वाडा |
| 11 | दिवाणी न्यायालय क स्तर, जव्हार |
| 12 | दिवाणी न्यायालय क स्तर, डहाणू |
| 13 | रेल्वे न्यायालय, कल्याण |
| 14 | रेल्वे न्यायालय विरार |

# विवरणपत्र

| | | |
|---|---|---|
| 1 | निविदा कंत्राटदाराचे / संस्थेचे कंपनीचे नांव | |
| 2 | निविदाकाराकडे सदर कामाचा पूर्वीचा अनुभव आहे काय? सध्या कोणकोणत्या संस्थेत काम चालु आहे त्याचा संपुर्ण तपशील | |
| 3 | निविदाकाराने खालील बाबींची पुर्तता केली आहे काय ? | |
| | 1. कंपनी, संस्थेची नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.<br>2. मागील 3 वर्षांचे आयकर विवरणपत्रे.<br>3. कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकार्डची साक्षांकित प्रत.<br>4. जी.एस.टी कर नोंदणी प्रमाणपत्र.<br>5. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.<br>6. भागीदार संस्था असल्यास, भागीदारी करार व नोंदणी केल्याची प्रत<br>7. निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र<br>8. अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्रे<br>9. कंपनी / संस्थेचे बचत अथवा चालू बँक खातेचे कागदपत्रे | |
| 4. | निविदाकाराने स्वतःवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे. | |

निविदाकाराचे नांव शिक्का व सही

ठाणे

दिनांक :

# <u>प्रपत्र – 01</u>

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, बेलापूर, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे येथील न्यायालये व कार्यालयांच्या संगणकांच्या लेझर प्रिंटरचे एचपी 78 अे/88 अे/12अे/ कॅनॉन 337/051 स्टार्टर/ सॅमसंग एमएलटी–डी 205 एस/डी 205 डी व क्योसेरा इकोसीस एम 2040 डीएन या प्रकारच्या टोनर्स काट्रेजच्या संबंधीत तालुक्यामध्ये जावून एका वर्षासाठी रिफिलिंग संबंधात निविदेसाठी द्यावयाचा दरांचा तपशिलवार तक्ता :

कामाचे स्वरुप व कालावधी : जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिन कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापूर, वाडा, जव्हार, डहाणू, पालघर, वसई, बेलापूर, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे येथील न्यायालये व कार्यालयातील टोनर काट्रेजचे एका वर्षासाठी रिफिलिंग करणेसाठी सेवासंविदा करार.

| | |
|---|---|
| एचपी 78 अे/88 अे/12 अे/ कॅनॉन 337/051 स्टार्टर/ सॅमसंग एमएलटी–डी 205 एस/डी 205 डी टोनर काट्रेज रिफिलिंग प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | |
| क्योसेरा इकोसीस एम 2040 डीएन टोनर काट्रेज रिफिलिंग प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | |

पुरवठादाराचे/फर्मचे नांव ..................................................

पुरवठादाराचा पत्ता भ्रमणध्वनीसह ....................................

पुरवठादाराची स्वाक्षरी ..........................................................

# हमीपत्र

मी, श्री. ---------------, प्रो. प्रा. ------------------ इंटरप्रायजेस, पत्ता, ------------------------------ संस्थेचा नोंदणी कमांक -------------------, संस्थेचा दुरध्वनी कमांक -------- याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आलेल्या टोनर रिफिलिंग करणेकामी निविदा भरतांना निविदा अर्जासोबतचे निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी /आम्ही पुरवठादार सर्व अटी व शर्तीचे करण्यास बांधील आहोत.

आपल्या कायालयाने सदर सेवेसाठी निर्गमित केलेले निर्देशन आमचेवर/भागीदारावर बंधनकारक राहील.

ठिकाण :

दिनांक : / /2024 स्वाक्षरी व शिक्का

---